अति.महा.आयुक्त (इ) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र.:- अतिमआ(इ)/क्रीडा/२७६
दिनांक :- १८/०६/२०२१

## कार्यालय परिपत्रक

**विषय :-** दिनांक २१ जून २०२१ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त पुणे मनपा व रमामणी अय्यंगार मेमोरियल योग संस्थेमार्फत पुणे महानगरपालिकेतील मा.सभासद,मा.अधिकारी वर्ग व कर्मचारी यांचेकरिता योग दिनाचे आयोजन करणेबाबत.

**संदर्भ:-** क्रीडा विभागाकडील जावक क्र. क्री.वि./ २६९ दिनांक १७.०६.२०२१.

दिनांक २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो. पुणे महानगरपालिकेतर्फे योग प्रशिक्षण राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मा. सभासद, मा. अधिकारी व कर्मचारी यांना दैनंदिन ताणतणावापासून मुक्त राहता यावे. त्यांच्यातील एकाग्रता व कार्यक्षमता वाढविणे, तसेच निरोगी जीवन जगता यावे याकरिता योगासनाद्वारे व सूर्यनमस्काराच्या माध्यमातून मानसिक व शारीरिक विकास साधनेसाठी दिनांक २१ जून २०२१ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त मा. क्रीडा आयुक्त व आयुष मंत्रालय यांच्या आदेशानुसार कोरोना विषयक सर्व नियमांचे पालन करून खालील प्रमाणे नियोजन करण्यात आले आहे.

१. मुख्य इमारतीत मागील बाजूस (उत्तरेस) सकाळी ७.३० ते ८.३० या वेळेत मा. सभासद, मा. अधिकारी, सर्व खातेप्रमुख प्रत्यक्ष उपस्थित होतील.
२. या व्यतिरिक्त उर्वरित सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग Facebook live link- Facebook.com/PMCPune किंवा google meet link- https://meet.google.com/nmn-doyy-aua या लिंकद्वारे ऑनलाईन सकाळी ७.१५ वाजता योगा प्रात्यक्षिकासाठी आवश्यक गणवेश व आसन व्यवस्थेसह सहभागी होतील.

तरी वरील सुचनांप्रमाणे दिनांक २१ जून २०२१ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग प्रात्यक्षिके करणेकरीता सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

(डॉ. कुणाल खेमनार)
अति.महा.आयुक्त (इ)
पुणे महानगरपालिका

प्रत :- १.मा. अति.महापालिका आयुक्त (ज) /(वि)
२.सर्व खातेप्रमुख / महा.सहा.आयुक्त
पुणे महानगरपालिका

यांजकडे पुढील कार्यवाहीस्तव...